राज्यातील २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०२५.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.०९/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
ईमेल- sec.council@mah.gov.in
दिनांक : ३०/०९/२०२५

निवडणूक तात्काळ
ई-मेलद्वारे

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व).
(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).

विषय:- राज्यातील २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०२५.

संदर्भ:- १. मा.सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल(सी) क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दिनांक १६/०९/२०२५ रोजी झालेला निर्णय

२. नगरविकास विभागाचे क्रएमसीआ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दि.१०/०६/२०२५ व सुधारित कार्यक्रम दि.१४/०८/२०२५ चे पत्र

३. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि.१६/०७/२०२५

४.राज्य निवडणूक आयोगाची क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२०/का-०७, दि.२१/०८/२०२५ रोजीची अधिसूचना

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. त्याअनुषंगाने परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या मुदत समाप्त झालेल्या व नवनिर्मित असे २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती अशा एकूण २८९ सदस्य तसेच थेट अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे आवश्यक आहे.

२. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या संदर्भाकित अ.क्र.१ मध्ये दिलेल्या दि.०६/०५/२०२५ निर्णयानुसार मुदत समाप्त झालेल्या व नवनिर्मित असे २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या अशा एकूण २८९ सदस्य तसेच थेट अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नगरविकास विभागाच्या संदर्भीय पत्र

क्र.२ प्रभागरचना कार्यक्रमानुसार दि.३०/०९/२०२५ रोजी प्रभागांची अंतिम रचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादी वापरण्यात येते. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदानाचा संभाव्य दिनांक लक्षात घेऊन मतदार यादी तयार करण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम ११ अन्वये एक विशिष्ट दिनांक (Cut off date) अधिसूचित केला जातो.

४. ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ११ नुसार विधानसभेची मतदार यादी नगरपरिषदांच्या प्रभागानुसार विभागून ती सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार करणे व अधिकाऱ्यांनी अधिसूचित करणे, या प्रयोजनासाठी दि. ०१/०७/२०२५ हा दिनांक संदर्भांकित क्र.४ नुसार अधिसूचित केला आहे (प्रत संलग्न). या विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करुन वरील निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

५. त्याअर्थी, दिनांक ०१/०७/२०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे नगरपरिषदा/नगरपंचायतींसाठी प्रभागनिहाय विभाजनासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

६. मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती :-

राज्य निवडणूक आयोगाने दि.२१/०८/२०२५ च्या अधिसूचनेन्वये दिनांक ०१/०७/२०२५ ही Cut-off date जाहीर केला असून, त्या दिवशी (म्हणजेच दि.०१/०७/२०२५ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी या सार्वत्रिक निवडणुकांसाठी वापरण्यात येईल. या मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय मतदारांचे विभाजन करण्याची

कार्यवाही करण्यात यावी. याकरिता राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/ का-८, दि.१६/०७/२०२५ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.

७. वरील मतदार यादी ग्राह्य धरुन उपरोक्त नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील :-

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : | ०८/१०/२०२५ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : | ०८/१०/२०२५ ते १३/१०/२०२५ |
| (iii) | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे. | : | २८/१०/२०२५ |
| (iv) | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे | : | ०७/११/२०२५ |

८. प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-

८.१ संबंधित मुख्याधिकारी यांनी विधानसभेच्या मतदार याद्यांचे खालील बाबींचा विचार करुन प्रभागनिहाय विभाजन करावे. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने नवीन संकेतस्थळ https://mahasecvoterlist.in विकसित केले असून या संकेतस्थळाचा वापर करावा :-

(i) संबंधीत जिल्हाधिकारी यांनी आवश्यक ते विधानसभा क्रमांक, मतदार संघ व यादी भाग क्रमांक इ. प्रमाणे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून आवश्यक विधानसभा मतदार संघाची मतदार यादी प्राप्त करुन घ्यावी.

(ii) सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता संबंधित नगरपरिषदा/ नगरपंचायतींना आयोगातील संगणकीकरण कक्षाकडून तयार केलेले यूजर आयडी व पासवर्ड यापूर्वीच उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

(iii) यूजर आयडी व पासवर्ड नुसार Election Assembly Master, Ward Master इ. अपलोड करावे. कंट्रोल चार्ट तयार करुन तो योग्य असल्याची खात्री करावी व तो योग्य असल्याची खात्री करुन संगणक प्रणालीमधून आपल्या स्तरावर मतदार यादीच्या PDF तयार करुन घ्याव्यात.

८.२ प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि नगरपरिषदा/ नगरपंचायतींसाठी तयार केलेल्या प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान असणे आवश्यक आहे. म्हणजेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधीत प्रभागातील सर्व मतदार, प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अथवा प्रभागाच्या हद्दीबाहेरील मतदार, त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत याची खात्री करावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत, मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.३/का-८, दि.१६/०७/२०२५ अन्वये कार्यवाही करावी. तसेच दुबार नावांसमोर विधानसभा निवडणुकांप्रमाणे विशिष्ट चिन्हे करुन अशा मतदारांच्या ओळखीचे पुरावे काटेकोरपणे तपासावेत.

क) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-ग्रापनि२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि.१६ जुलै, २०२५ चे आदेश)

८.३ महाआयटीतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या नगरपरिषदा/ नगरपंचातींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन करावे. (https://mahasecvoterlist.in या URL वर उपलब्ध असणारा मदररोलच ग्राह्य धरण्यात येणार आहे.)

९. प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला संबंधित मुख्याधिकारी यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

१०. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन संबंधीत मुख्याधिकारी यांनी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-

१०.१ संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दि.०८/१०/२०२५ ते दि.१३/१०/२०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

i. लेखनिकांच्या काही चुका.

ii. दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.

iii. संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

iv. मृत व्यक्तींची नावे आढळल्यास किंवा त्याबाबत हरकती किंवा सूचना प्राप्त झाल्यास त्याची नोंद मार्ककॉपी मध्ये घेणे

१०.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर संबंधीत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

११. संबंधीत मुख्याधिकारी यांनी अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना विहित तारखेस प्रसिध्द करण्यात यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

१२. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस मुख्याधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे:-

(i) नगरपरिषदांचे/ नगरपंचायतींचे मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ii) स्थानिक वृत्तपत्र

(iii) नगर परिषदांच्या/ नगरपंचायतींच्या तहसील कार्यालयाचे सूचना फलक.

(iv) स्थानिक केबल टि.व्ही.

(v) जिल्हाधिकारी व नगर परिषद/ नगर पंचायत यांचे संकेतस्थळ, इत्यादी.

१३. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखाद्या नगरपरिषदेच्या/ नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीबाबत न्यायालयाचे / शासनाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास सदर मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१४. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांची राहील.

१५. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणी संदर्भात आयोगाचे नोडल अधिकारी (संगणकीकरण) यांच्याकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास ई-मेलद्वारे संपर्क साधण्यात यावा, आणि अत्यंत तात्कालीक कारण असल्यास दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

श्री. समीर गंदपवार (संगणकीकरण कक्ष)

दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२८८६९५० / २२०२२९०९,

email - sec.compu@mah.gov.in

१६. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(सुरेश काकाणी) ३०.०८.२०२५

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र- परिशिष्ट- १

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
५. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, सर्व
६. सहायक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
७. संबंधित नगरपरिषदांचे/नगरपंचायतींचे प्रशासक/मुख्याधिकारी
८. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१०. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
११. निवड नस्ती (का-६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

| क्र. रानिआ / नप-२०२५ /प्र.क्र.१० / का-६ | | | | |
|---|---|---|---|---|
| परिशिष्ट - १ | | | | |
| अ.क्र | जिल्हा | नगरपरिषद / नगरपंचायतीचे नाव | नप/नपं | वर्ग |
| १ | पालघर | डहाणू | नप | ब |
| २ | पालघर | जव्हार | नप | क |
| ३ | पालघर | पालघर | नप | ब |
| ४ | पालघर | वाडा | नपं | |
| ५ | रायगड | अलिबाग | नप | क |
| ६ | रायगड | कर्जत | नप | क |
| ७ | रायगड | खोपोली | नप | ब |
| ८ | रायगड | महाड | नप | क |
| ९ | रायगड | माथेरान | नप | क |
| १० | रायगड | मुरुड-जंजिरा | नप | क |
| ११ | रायगड | पेण | नप | क |
| १२ | रायगड | रोहा | नप | क |
| १३ | रायगड | श्रीवर्धन | नप | क |
| १४ | रायगड | उरण | नप | क |
| १५ | रत्नागिरी | चिपळूण | नप | ब |
| १६ | रत्नागिरी | देवरुख | नपं | |
| १७ | रत्नागिरी | गुहागर | नपं | |
| १८ | रत्नागिरी | खेड | नप | क |
| १९ | रत्नागिरी | लांजा | नपं | |
| २० | रत्नागिरी | राजापूर | नप | क |
| २१ | रत्नागिरी | रत्नागिरी | नप | ब |
| २२ | सिंधुदूर्ग | कणकवली | नपं | |
| २३ | सिंधुदूर्ग | मालवण | नप | क |
| २४ | सिंधुदूर्ग | सावंतवाडी | नप | क |
| २५ | सिंधुदूर्ग | वेंगुर्ला | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | ठाणे | अंबरनाथ | नप | अ |
| २७ | ठाणे | कुळगाव-बदलापूर | नप | अ |
| २८ | अहिल्यानगर | देवळाली-प्रवरा | नप | क |
| २९ | अहिल्यानगर | जामखेड | नप | क |
| ३० | अहिल्यानगर | कोपरगाव | नप | ब |
| ३१ | अहिल्यानगर | नेवासा | नपं | |
| ३२ | अहिल्यानगर | पाथर्डी | नप | क |
| ३३ | अहिल्यानगर | राहाता | नप | क |
| ३४ | अहिल्यानगर | राहूरी | नप | क |
| ३५ | अहिल्यानगर | संगमनेर | नप | ब |
| ३६ | अहिल्यानगर | शेवगाव | नप | क |
| ३७ | अहिल्यानगर | शिर्डी | नप | क |
| ३८ | अहिल्यानगर | श्रीगोंदा | नप | क |
| ३९ | अहिल्यानगर | श्रीरामपूर | नप | ब |
| ४० | धुळे | दोंडाईचा-वरवाडे | नप | ब |
| ४१ | धुळे | पिंपळनेर | नप | क |
| ४२ | धुळे | सिंदखेडा | नपं | |
| ४३ | धुळे | शिरपूर-वरवाडे | नप | ब |
| ४४ | जळगाव | जामनेर | नप | ब |
| ४५ | जळगाव | अमळनेर | नप | ब |
| ४६ | जळगाव | भडगाव | नप | क |
| ४७ | जळगाव | भूसावळ | नप | अ |
| ४८ | जळगाव | चाळीसगाव | नप | ब |
| ४९ | जळगाव | चोपडा | नप | ब |
| ५० | जळगाव | धरणगांव | नप | क |
| ५१ | जळगाव | एरंणडोल | नप | क |
| ५२ | जळगाव | फैजपूर | नप | क |
| ५३ | जळगाव | मुक्ताईनगर | नपं | |
| ५४ | जळगाव | नशिराबाद | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५५ | जळगाव | पाचोरा | नप | ब |
| ५६ | जळगाव | परोळा | नप | क |
| ५७ | जळगाव | रावेर | नप | क |
| ५८ | जळगाव | सावदा | नप | क |
| ५९ | जळगाव | शेंदूर्णी | नपं | |
| ६० | जळगाव | वरणगांव | नप | क |
| ६१ | जळगाव | यावल | नप | क |
| ६२ | नंदूरबार | शहादा | नप | ब |
| ६३ | नंदूरबार | नंदूरबार | नप | अ |
| ६४ | नंदूरबार | नवापूर | नप | क |
| ६५ | नंदूरबार | तळोडा | नप | क |
| ६६ | नाशिक | भगुर | नप | क |
| ६७ | नाशिक | मनमाड | नप | ब |
| ६८ | नाशिक | नांदगाव | नप | क |
| ६९ | नाशिक | सटाणा | नप | क |
| ७० | नाशिक | सिन्नर | नप | ब |
| ७१ | नाशिक | येवला | नप | ब |
| ७२ | नाशिक | चांदवाड | नप | क |
| ७३ | नाशिक | इगतपूरी | नप | क |
| ७४ | नाशिक | ओझर | नप | ब |
| ७५ | नाशिक | पिंपळगांव बसमत | नप | क |
| ७६ | नाशिक | त्र्यंबक | नप | क |
| ७७ | कोल्हापूर | आजरा | नपं | |
| ७८ | कोल्हापूर | चंदगड | नपं | |
| ७९ | कोल्हापूर | गडहिंग्लज | नप | क |
| ८० | कोल्हापूर | हातकणंगले | नपं | |
| ८१ | कोल्हापूर | हुपरी | नप | क |
| ८२ | कोल्हापूर | जयसिंगपूर | नप | ब |
| ८३ | कोल्हापूर | कागल | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८४ | कोल्हापूर | कुरुंदवाड | नप | क |
| ८५ | कोल्हापूर | मलकापूर | नप | क |
| ८६ | कोल्हापूर | मुरगूड | नप | क |
| ८७ | कोल्हापूर | पन्हाळा | नप | क |
| ८८ | कोल्हापूर | शिरोळ | नप | क |
| ८९ | कोल्हापूर | वडगाव (कोल्हापूर) | नप | क |
| ९० | पुणे | आळंदी | नप | क |
| ९१ | पुणे | बारामती | नप | अ |
| ९२ | पुणे | भोर | नप | क |
| ९३ | पुणे | चाकण | नप | ब |
| ९४ | पुणे | दौंड | नप | ब |
| ९५ | पुणे | फुरसुंगी-उरळी देवाची | नप | क |
| ९६ | पुणे | इंदापूर | नप | क |
| ९७ | पुणे | जेजूरी | नप | क |
| ९८ | पुणे | जुन्नर | नप | क |
| ९९ | पुणे | लोणावळा | नप | क |
| १०० | पुणे | मालेगाव बु. | नपं | |
| १०१ | पुणे | मंचर | नपं | |
| १०२ | पुणे | राजगुरुनगर | नप | क |
| १०३ | पुणे | सासवड | नप | क |
| १०४ | पुणे | शिरुर | नप | क |
| १०५ | पुणे | तळेगाव-दाभाडे | नप | ब |
| १०६ | पुणे | वडगाव (पुणे) | नपं | |
| १०७ | सांगली | आष्टा | नप | क |
| १०८ | सांगली | आटपाडी | नपं | |
| १०९ | सांगली | इस्लामपूर | नप | ब |
| ११० | सांगली | जत | नप | क |
| १११ | सांगली | पळूस | नप | क |
| ११२ | सांगली | शिराळा | नपं | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११३ | सांगली | तासगाव | नप | क |
| ११४ | सांगली | विटा | नप | ब |
| ११५ | सातारा | कराड | नप | ब |
| ११६ | सातारा | महाबळेश्वर | नप | क |
| ११७ | सातारा | मलकापूर(सातारा) | नप | क |
| ११८ | सातारा | मेढा | नपं | |
| ११९ | सातारा | म्हसवड | नप | क |
| १२० | सातारा | पाचगणी | नप | क |
| १२१ | सातारा | फलटण | नप | ब |
| १२२ | सातारा | रहिमतपूर | नप | क |
| १२३ | सातारा | सातारा | नप | अ |
| १२४ | सातारा | वाई | नप | क |
| १२५ | सोलापूर | अक्कलकोट | नप | ब |
| १२६ | सोलापूर | अकलूज | नप | ब |
| १२७ | सोलापूर | अनागर | नपं | |
| १२८ | सोलापूर | बार्शी | नप | अ |
| १२९ | सोलापूर | दुधनी | नप | क |
| १३० | सोलापूर | करमाळा | नप | क |
| १३१ | सोलापूर | कुर्डूवाडी | नप | क |
| १३२ | सोलापूर | मैंदर्गी | नप | क |
| १३३ | सोलापूर | मंगळवेढा | नप | क |
| १३४ | सोलापूर | मोहोळ | नप | क |
| १३५ | सोलापूर | पंढरपूर | नप | ब |
| १३६ | सोलापूर | सांगोला | नप | क |
| १३७ | बीड | अंबेजोगाई | नप | ब |
| १३८ | बीड | बीड | नप | अ |
| १३९ | बीड | धारुर | नप | क |
| १४० | बीड | गेवराई | नप | क |
| १४१ | बीड | माजलगाव | नप | ब |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४२ | बीड | परळी-वैजनाथ | नप | ब |
| १४३ | छ. संभाजीनगर | फुलंब्री | नपं | |
| १४४ | छ. संभाजीनगर | गंगापूर | नप | क |
| १४५ | छ. संभाजीनगर | कन्नड | नप | ब |
| १४६ | छ. संभाजीनगर | खुलताबाद | नप | क |
| १४७ | छ. संभाजीनगर | पैठण | नप | ब |
| १४८ | छ. संभाजीनगर | सिल्लोड | नप | ब |
| १४९ | छ. संभाजीनगर | वेजापूर | नप | ब |
| १५० | धाराशिव | भूम | नप | क |
| १५१ | धाराशिव | कळंब | नप | क |
| १५२ | धाराशिव | मुरुम | नप | क |
| १५३ | धाराशिव | नळदुर्ग | नप | क |
| १५४ | धाराशिव | धाराशिव | नप | अ |
| १५५ | धाराशिव | परंडा | नप | क |
| १५६ | धाराशिव | तुळजापूर | नप | क |
| १५७ | धाराशिव | उमरगा | नप | क |
| १५८ | हिंगोली | बसमतनगर | नप | ब |
| १५९ | हिंगोली | हिंगोली | नप | ब |
| १६० | हिंगोली | कळमनुरी | नप | क |
| १६१ | जालना | अंबड | नप | क |
| १६२ | जालना | भोकरदन | नप | क |
| १६३ | जालना | परतूर | नप | क |
| १६४ | लातूर | अहमदपूर | नप | ब |
| १६५ | लातूर | औसा | नप | क |
| १६६ | लातूर | निलंगा | नप | क |
| १६७ | लातूर | रेनापूर | नपं | |
| १६८ | लातूर | उदगीर | नप | अ |
| १६९ | नांदेड | बिलोली | नप | क |
| १७० | नांदेड | देगलूर | नप | ब |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७१ | नांदेड | धर्माबाद | नप | क |
| १७२ | नांदेड | हदगाव | नप | क |
| १७३ | नांदेड | हिमायतनगर | नपं | क |
| १७४ | नांदेड | कंधार | नप | क |
| १७५ | नांदेड | कुंडलवाडी | नप | क |
| १७६ | नांदेड | मुदखेड | नप | क |
| १७७ | नांदेड | मुखेड | नप | क |
| १७८ | नांदेड | उमरी | नप | क |
| १७९ | नांदेड | भोकर | नप | क |
| १८० | नांदेड | किनवट | नप | क |
| १८१ | नांदेड | लोहा | नप | क |
| १८२ | परभणी | गंगाखेड | नप | ब |
| १८३ | परभणी | जिंतूर | नप | ब |
| १८४ | परभणी | मानवत | नप | क |
| १८५ | परभणी | पाथरी | नप | क |
| १८६ | परभणी | पूर्णा | नप | क |
| १८७ | परभणी | सेलू | नप | ब |
| १८८ | परभणी | सोनपेठ | नप | क |
| १८९ | अकोला | अकोट | नप | ब |
| १९० | अकोला | बाळापूर | नप | ब |
| १९१ | अकोला | बार्शी-टाकळी | नपं | |
| १९२ | अकोला | हिवरखेडा | नप | क |
| १९३ | अकोला | मुर्तीजापूर | नप | ब |
| १९४ | अकोला | पातूर | नप | क |
| १९५ | अकोला | तेलहरा | नप | क |
| १९६ | अमरावती | अचलपूर | नप | अ |
| १९७ | अमरावती | अंजनगाव सुर्जी | नप | ब |
| १९८ | अमरावती | चांदूरबाजार | नप | क |
| १९९ | अमरावती | चांदूर रेल्वे | नप | क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०० | अमरावती | चिखलदरा | नप | क |
| २०१ | अमरावती | दर्यापूर | नप | क |
| २०२ | अमरावती | धामणगाव रेल्वे | नप | क |
| २०३ | अमरावती | धरणी | नपं | |
| २०४ | अमरावती | मोर्शी | नप | क |
| २०५ | अमरावती | नंद-खांदेश्वर | नपं | |
| २०६ | अमरावती | शेंदूरजनाघाट | नप | क |
| २०७ | अमरावती | वरुड | नप | ब |
| २०८ | बुलढाणा | बुलढाणा | नप | ब |
| २०९ | बुलढाणा | चिखली | नप | ब |
| २१० | बुलढाणा | देऊळगाव राजा | नप | क |
| २११ | बुलढाणा | जळगाव जामोद | नप | क |
| २१२ | बुलढाणा | खामगाव | नप | ब |
| २१३ | बुलढाणा | लोणार | नप | क |
| २१४ | बुलढाणा | मलकापूर (बुलढाणा) | नप | ब |
| २१५ | बुलढाणा | मेहकर | नप | ब |
| २१६ | बुलढाणा | नांदूरा | नप | ब |
| २१७ | बुलढाणा | शेगाव | नप | ब |
| २१८ | बुलढाणा | सिंदखेडराजा | नप | क |
| २१९ | वाशिम | कारंजा | नप | ब |
| २२० | वाशिम | मालेगाव . | नपं | |
| २२१ | वाशिम | मंगरुळपीर | नप | क |
| २२२ | वाशिम | रिसोड | नप | क |
| २२३ | वाशिम | वाशिम | नप | ब |
| २२४ | यवतमाळ | आर्णी | नप | क |
| २२५ | यवतमाळ | दारव्हा | नप | क |
| २२६ | यवतमाळ | दिग्रस | नप | ब |
| २२७ | यवतमाळ | घाटंजी | नप | क |
| २२८ | यवतमाळ | पुसद | नप | ब |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२९ | यवतमाळ | उमरखेड | नप | ब |
| २३० | यवतमाळ | वणी | नप | ब |
| २३१ | यवतमाळ | यवतमाळ | नप | अ |
| २३२ | यवतमाळ | ढाणकी | नपं | |
| २३३ | यवतमाळ | नेर-नबाबपूर | नप | क |
| २३४ | यवतमाळ | पांढरकवडा | नप | क |
| २३५ | भंडारा | पवनी | नप | क |
| २३६ | भंडारा | साकोली शेंदूरवाफा | नप | क |
| २३७ | भंडारा | तुमसर | नप | ब |
| २३८ | भंडारा | भंडारा | नप | ब |
| २३९ | चंद्रपूर | बल्लारपूर | नप | ब |
| २४० | चंद्रपूर | भद्रावती | नप | ब |
| २४१ | चंद्रपूर | भिसी | नपं | |
| २४२ | चंद्रपूर | ब्रह्मपूरी | नप | क |
| २४३ | चंद्रपूर | चिमूर | नप | क |
| २४४ | चंद्रपूर | गडचांदूर | नप | क |
| २४५ | चंद्रपूर | घुग्घुस | नप | क |
| २४६ | चंद्रपूर | मूल | नप | क |
| २४७ | चंद्रपूर | नागभीड | नप | क |
| २४८ | चंद्रपूर | राजुरा | नप | क |
| २४९ | चंद्रपूर | वरोरा | नप | ब |
| २५० | गडचिरोली | आरमोरी | नप | क |
| २५१ | गडचिरोली | देसाईगंज | नप | क |
| २५२ | गडचिरोली | गडचिरोली | नप | ब |
| २५३ | गोंदिया | गोंदिया | नप | अ |
| २५४ | गोंदिया | गोरेगाव | नपं | |
| २५५ | गोंदिया | सालेकसा | नपं | |
| २५६ | गोंदिया | तिरोडा | नप | क |
| २५७ | नागपूर | बहादूरा | नपं | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५८ | नागपूर | बेसा पिपळा | नपं | |
| २५९ | नागपूर | भिवापूर | नपं | |
| २६० | नागपूर | बुटीबोरी | नप | क |
| २६१ | नागपूर | डिगडोह | नप | क |
| २६२ | नागपूर | कळमेश्वर-ब्रह्मणी | नप | क |
| २६३ | नागपूर | कामठी | नप | ब |
| २६४ | नागपूर | कांद्री-कन्हान | नपं | |
| २६५ | नागपूर | काटोल | नप | ब |
| २६६ | नागपूर | खापा | नप | क |
| २६७ | नागपूर | कोंढाळी | नपं | |
| २६८ | नागपूर | महादुळा | नपं | |
| २६९ | नागपूर | मोहपा | नप | क |
| २७० | नागपूर | मौदा | नपं | |
| २७१ | नागपूर | नरखेड | नप | क |
| २७२ | नागपूर | निलडोह | नपं | |
| २७३ | नागपूर | पारशिवणी | नपं | |
| २७४ | नागपूर | रामटेक | नप | क |
| २७५ | नागपूर | सावनेर | नप | क |
| २७६ | नागपूर | उमरेड | नप | ब |
| २७७ | नागपूर | वानाडोंगरी | नप | क |
| २७८ | नागपूर | बिडगाव-तरोडी (खू) पांढुर्णा | नपं | |
| २७९ | नागपूर | गोधणी(रेल्वे) | नपं | |
| २८० | नागपूर | कन्हान-पिपरी | नप | क |
| २८१ | नागपूर | मोवाड | नप | क |
| २८२ | नागपूर | वाडी | नप | ब |
| २८३ | नागपूर | येरखेडा | नपं | |
| २८४ | वर्धा | आर्वी | नप | ब |
| २८५ | वर्धा | देवळी | नप | क |
| २८६ | वर्धा | हिंगणघाट | नप | अ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८७ | वर्धा | पुलगाव | नप | क |
| २८८ | वर्धा | सिंदी रेल्वे | नप | क |
| २८९ | वर्धा | वर्धा | नप | अ |
| | | एकूण | २८९ | |